**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १६ ब

## 'भगवान हे डॉक्टरांचे डॉक्टर आहेत.'

नंतर भगवान एका वयस्कर शिक्षकाकडे वळले. त्यांच्याकडे पाहून भगवान म्हणाले, ''अंऽऽ उद्यापासून बी-कॉम्प्लेक्स सुरू कर. तुला बी-कॉम्प्लेक्सची जरूरी आहे.''

शिक्षक म्हणाले, ''होय स्वामी, मी उद्यापासूनच बी-कॉम्प्लेक्स घ्यायला सुरुवात करतो.'' इतक्यात भजनाची वेळ झाली आणि भजनाला सुरूवात झाली. डॉक्टर मंडळी आत येण्याची गर्दी करू लागले- हे डॉक्टर समोरच व्हरांड्यात बसलेले होते. ते घाईने आत जाऊ लागले. स्वामींनी एका डॉक्टरला बोलावले, ''इकडे या. या वृद्ध माणसाला कशाची गरज आहे हे सांगा?'' डॉक्टरांनी त्याच्याकडे पाहिले आणि म्हणाले, ''आह्, स्वामी, त्याला बी-कॉम्प्लेक्स दिलं पाहिजे.'' हसत हसत लगेचच स्वामी म्हणाले, ''हे बघ, मी तुला म्हटलं नव्हतं? त्याला बी-कॉम्प्लेक्सची जरूरी आहे!''

भगवान हे डॉक्टरांचे डॉक्टर आहेत.

## ''एम्.एस्सी. नंतर एम्.आर.एस.''

यानंतरची घटना भगवानांचे विद्यार्थी आणि त्यांच्या परीक्षेबाबत झालेले संभाषण आहे. एक विद्यार्थी म्हणाला, ''स्वामी, या मार्चमध्ये मी एम.एस्सी. पूर्ण करणार आहे. त्यानंतर मी काय करावं?''

(सुहृदांनो, मी मागे जरी सांगितले होतं, तरी पुन्हा एकदा सांगतो. मी सांगितलेले महिने तेलगु सनातन सारथीमध्ये ह्या प्रसंगाबद्दल आलेले आहे. पण प्रत्यक्ष प्रसंग दुसऱ्याच एका वेळचा होता आणि सनातन सारथी मला जास्त पाने देऊ शकत नव्हते. प्रत्येक अंकात ते दोन किंवा तीन प्रसंगच छापू शकत होते. उरलेले प्रसंग ते पुढच्या अंकात येत असत. असा हा क्रम असतो. माझा मुद्दा तुमच्या लक्षात आला असेल असं मला वाटतं.) तेव्हा तो मुलगा म्हणाला, ''स्वामी, मी एम.एस्सी. पूर्ण केलं आहे. मी आता काय करावं?''

स्वामी म्हणाले, ''एम्.आर.एस. कर.'' कोणालाच म्हणजे काय ते समजलं नाही. तो मुलगा म्हणाला, ''एम.आर.एस.?''

स्वामी म्हणाले, ''एम्.आर.एस. - लग्न कर. तुला आता ते करायला हवं.''

## ''मार्च २००१. खूप कष्ट आणि दैवी कृपा.''

२००१ च्या मार्चमध्ये १०वीचे आणि १२वी चे विद्यार्थी हे शेवटच्या परीक्षेकरता तयारी करत होते. तुम्हाला माहीतच असेल की आपल्या शाळेचे विद्यार्थी, १०वी आणि १२वी चे सी.बी.एस.सी.च्या परीक्षा पद्धतीसाठी बसतात. ही केंद्र सरकारची पद्धत आहे. त्यांना संपूर्ण भारतातून आलेल्या विद्यार्थ्यांबरोबर चढाओढ, स्पर्धा करावयाची असते. तुम्हाला माहीत असेलच की स्वामींचे उच्च माध्यमिक परीक्षेचे विद्यार्थी - १०वी व १२ वीचे विद्यार्थी - हे १०० टक्के विद्यार्थी ९०% गुण मिळवलेले असतात! हे तुम्ही त्याच्या नोंदींवरून पडताळून पाहू शकता. याच्या मागे विद्यार्थ्यांचे अपार कष्ट आणि त्याबरोबरील दैवी कृपेची साथ असते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कष्टाचे गुण मिळतात आणि त्याबरोबर बाबांनी दिलेले अनुग्रहाचे गुण मिळून ते सहज ९०% गुण होत असत.

## ‘‘साई मूल्यमापनाप्रमाणे पुढे जाण्याकरता ९०% गुणांची आवश्यकता’’

मग स्वामी विद्यार्थ्यांकडे पाहू लागले, ‘हंऽऽ! तुमच्यापैकी काही जणांना ८०% गुण मिळतील.’’ ते त्या दिवशीच्या उत्तर पत्रिकेचा संदर्भ देत होते, एकूण सर्व गुणांविषयी नाही. त्या दिवशी भौतिक शास्त्राची परीक्षा झाली होती. स्वामी त्या दिवशीच्या प्रश्नपत्रिकेच्या शंभर टक्क्यांबद्दल बोलत होते. विद्यार्थ्यांनी त्या दिवशी सकाळीच उत्तरं लिहिली होती, पण त्या उत्तरपत्रिका अजून दिल्लीला पाठवलेल्या नव्हत्या. ते पेपर परीक्षकांकडेही पाठवले गेले नव्हते. परीक्षकांनी ते अजून तपासलेलेही नव्हते. तरीदेखील स्वामी गुणांबद्दल बोलत होते. बघितलंत?’’

‘‘आजच्या उत्तरपत्रिका तुमच्यापैकी काहींना ८० च्या वर, पण पुष्कळांना ६० ते ७० च्या दरम्यान गुण मिळतील. मुलांनो, इकडे लक्ष द्या. माझ्या मताप्रमाणे तुम्हाला जर ९०च्या वर गुण मिळाले तर तुम्ही उत्तीर्ण व्हाल.’’ तेव्हा बघितलंत. ते असं पुढे म्हणाले की, ‘‘आणि जर तुम्हाला ८०च्या वर गुण मिळाले तर चालवून घेण्यासारखे आहे. आणि जर त्यापेक्षा कमी पडले, तर मी अनुत्तीर्ण समजतो.’’ आणि त्यांनी असाही शेरा दिला, ‘‘जर तुम्हाला ७० टक्के गुण मिळाले तर त्याचा अर्थ होईल की तुमच्या ३०% चुका झाल्या आहेत. त्या ३० चुका काय झाल्या? ७० बरोबर उत्तरं आहेत आणि ३० चुकीची आहेत. म्हणून तुम्ही इतक्या चुका करू नयेत असं मला वाटतं.’’ असं भगवान म्हणाले.

त्यानंतर त्यांनी दुसऱ्या मुलाकडे पाहिलं. ‘‘तुला, आज सकाळी तू एका प्रश्नाचं उत्तर चांगलं दिलं नाहीस. ते समाधानकारक नव्हतं. तू तिथे थोडासा गोंधळलेला होतास.’’

तो मुलगा गोंधळला आणि थरथरून कापू लागला. मग स्वामींनी आणखी एका मुलाकडे पाहिलं आणि म्हणाले, ‘‘मुला, आज सकाळी तू कसं काय केलंस?’’ ‘‘स्वामी, छान केलंय.’’ ‘‘नाही नाही, नाही. तू छान केलंस असं तुला वाटतं, पण तुला हवं तितकं नाही.’’ आणि त्यानंतर अचानकपणे त्यांनी दोन मुलांना त्यांच्या नावाने हाक मारून बोलावले. ‘‘आजच्या उत्तरपत्रिकेत तुम्हा दोघांनाही ९० पेक्षा जास्त गुण मिळणार आहेत.’’

जेव्हा स्वामी असं बोलतात, तेव्हा आपली परिस्थिती कशी होत असेल? मी मगाशी सांगितल्याप्रमाणे उत्तरपत्रिका अजून दिल्लीला पाठवायच्या होत्या. त्या अजून परीक्षकांकडे पाठवायच्या होत्या. त्या तपासण्याकरता अजून वेळ होता. पण देवाने आजच त्याचे गुण सांगितले होते. हंऽऽ हीच खरी सुंदर गोष्ट आहे. आणि आम्हाला त्याचेच फार आश्चर्य वाटत होते.

स्वामी म्हणाले, ‘‘अरे बाबा, मी इथे बसलो असलो तरी मला प्रत्येक गोष्ट माहीत असते.’’ असं भगवान म्हणाले.

## ‘‘जबाबदाऱ्या पार पाडा’’

त्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वामींकडे आले आणि म्हणाले, ‘‘भगवान, आम्हाला तुमच्याबरोबरच राहावयाचे आहे. अगदी आमचे शिक्षण संपल्यावरसुद्धा आम्हाला तुमच्याकडेच राहावयाचे आहे. आम्हाला तुमची सेवा करायची आहे. आम्हाला जायला सांगू नका. तुमच्याजवळच राहू द्या. त्यांनी अशी प्रार्थना केली. तेव्हा बाबा म्हणाले, ‘‘तुम्ही तुमच्या पालकांची सेवा करा.’’

एका विद्यार्थ्याने ताबडतोब उत्तर दिले, ‘‘नाही. स्वामी, आमच्या पालकांनासुद्धा आम्ही इथेच राहावे असे वाटते.’’ त्यावेळेस तिथे बसलेले एक प्राध्यापक म्हणाले, ‘‘स्वामी, प्रत्येकालाच तुमच्या जवळ राहावयाचे असेल, तर त्याकरता त्याला तुमच्याकडून दैवी कृपा असावयास पाहिजे. प्रत्येकालाच इथे राहणे शक्य होणार नाही.

## ‘‘दैवी कृपा किंवा दैवी इच्छा’’

मित्रांनो, हे सगळ्याकरता खरे आहे. तुमच्यापैकी जे बरीच वर्षे राहिले असतील, जे दीर्घ काल येथे राहत

असतील, त्यांना पटेल की आपण येथे त्यांच्या कृपेमुळेच राहिलो आहोत. कधी कधी आपल्याला असे वाटेल की इथून पळून जावं, पण तेव्हा शक्य नसतं! मी काही त्याला अपवाद नाही. काही वेळा मला खूप उदास वाटतं, निराशा, वैफल्य, थकवा जाणवतो आणि मग मी माझ्या सुखसोयींची, नातलगांबरोबरच्या मजा हे सारे आठवतो आणि त्यावेळेस मला पळून जावेसे वाटे, अगदी लगेच! अशा वेळी दुसऱ्या दिवशी सकाळी भगवानांनी माझ्याकडे पाहून हास्य केले आणि त्यामुळे माझे पूर्ण समाधान झाले. आम्हाला दुसरं काहीही माहीत नसतं. फक्त त्यांनाच माहीत असतं. त्यांची माणसांना आपल्याभोवती नाचत ठेवण्याची पद्धत माहीत आहे. म्हणून मी म्हणतो, ''नाही, नाही, मी माझा म्हणून नाही, मी स्वत:हून नाही, त्यांची इच्छा आहे की मी इथे असावं. म्हणून मी इथे आहे.'' आश्रमातील जीवन – त्यांच्याबरोबर मी गेली १४ वर्षे आहे यावर माझा विश्वास बसतनाही. कारण मी स्वतंत्र वृत्तीचा माणूस आहे, सगळ्यांबरोबर हिंडतो, फिरतो, बोलतो आणि सगळ्यांच्यात मिसळतो म्हणून मी गेली १४ वर्षे येथे आहे यावर माझा विश्वास बसत नाही. तो मीच आहे का दुसरा कोणी आहे? तेव्हा निष्कर्ष असा निघतो की कोणालाही स्वामींसमवेत इथे राहायचं असेल, तर त्यासाठी स्वामींची विशेष कृपा असावी लागते, असे ते प्राध्यापक म्हणाले.

''तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर तुम्हाला माझी कृपा मिळेल.'' आणि भगवानांनी एक उदाहरण दिलं. ''पाण्याचे वाफेत परिवर्तन होते. त्याचे ढग बनतात आणि नंतर पावसाच्या स्वरूपात खाली उतरतात.'' हे खरं आहे ना? स्वामींनी त्या रुपकाचा आधार घेऊन स्पष्ट करून सांगायला सुरूवात केली, ''दैवी कृपा म्हणजे पाऊस. पाण्याची वाफ होणं म्हणजे स्वामींच्या आज्ञा पाळण्याची वृत्ती, स्वामींशी असलेला प्रामाणिकपणा हे होय. तेव्हा पाण्याची वाफ होणं, त्याचे ढग होणं म्हणजे तुमचा आज्ञाधारकपणा, तुमची शिस्त आणि स्वामींच्या शब्दावरील विश्वास हे कारणीभूत  आणि पावसाचे थंड पाणी पृथ्वीवर येणं ही माझी कृपा.'' असं स्वामी म्हणाले. त्यावर त्यांनी म्हटले, ''परंतु...'' ह्या 'परंतु' शब्दाबद्दल आपण फार काळजीपूर्वक राहिलं पाहिजे. या 'पण' (परंतु) शब्दामध्ये सर्व काही भरलेले आहे. इथे एक लहानसे उदाहरण आहे: ''स्वामी, तो चांगला मुलगा आहे. तो चांगला आहे, पण कधी मधी...'' तेव्हा स्वामी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने 'पण' असे म्हणाले, ''काय स्वामी? काय?''

''सर्व ढगांमध्ये काही ढग मातीच्या कणांनी भरलेले असतात– त्यातून पाऊस पडत नाही. पाण्याच्या थेंबांनी भरलेले ढग पावसाच्या रूपाने खाली येतात, पण धुराने आणि धुक्याने भरलेले ढग पाऊस पाडत नाहीत. दुसऱ्या शब्दात जे ढग पाण्याच्या थेंबांनी भरलेले असतात, त्या ढगापासून पावसाच्या रूपाने खाली येतात. पाण्याच्या थेंबांनी भरलेले ढग म्हणजे स्वामींच्या आज्ञा पाळण्याचा निर्णय होतो. मग तुम्हाला माझ्या कृपेचा वर्षाव अनुभुयला मिळेल.'' भगवान असं म्हणाले.

## ''सर्वज्ञता आणि सर्वव्यापकता''

तिथे असलेल्या ६०० विद्यार्थ्यांपैकी त्यांनी विपिन, साईचरण, दीपक आणि विनय अशा चार नावांचा उल्लेख केला. त्यांनी फक्त चारच नावे घेतली होती. ती मुले उभी राहिली. कोण आहेत ही मुलं? भगवानांनी त्यांच्याकडे पाहिलं आणि म्हणाले, ''तुम्ही ती चार मुलं आहात, ज्यांनी निश्चितच १००% मिळवले आहेत.'' ती मुलं ताबडतोब पळत जाऊन भगवानांच्या पाया पडली, पादनमस्कार घेतला. नंतर ते म्हणाले, ''आजची भौतिक विज्ञानाची प्रश्नपत्रिका सोपी होती. मला माहीत आहे, तुमच्यापैकी बहुतेकांना जे माहीत होतं, तेच विचारलं गेलं होतं.''

जेव्हा स्वामी अशा तऱ्हेने विद्यार्थ्यांबद्दल, त्यांच्या परीक्षेबद्दल, त्यांच्या गुणांबद्दल आणि नावाने हाक मारून त्यांचे गुण सांगण्याबद्दल बोलतात, तेव्हा त्यांची सर्वज्ञता आणि सर्वव्यापकता याचे प्रकटीकरण होते, एवढेच नव्हे तर आपला त्यांच्यावरील विश्वास दृढ होतो. कारण ते त्यांचे देवत्व आपल्यासमोर प्रकट करत असतात.